# सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली.

Since 1935

प्रधान कार्यालय: 404, खणभाग, सांगली 416 416 फोनः (0233) 2376236/37/38 (Scheduled Co-Op. Bank)

sublegal@sangliurbanbank.com | subsachiv@sangliurbanbank.com | www.sangliurbanbank.in


## जाहीर (निविदा) नोटीस

मी खाली सही करणार अधिकृत अधिकारी, मला "**सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सीअल असेटस् अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२**" चे कलम १३ (१२) व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम क्र. ८ व ९ मधील तरतूदीस अनुसरुन तमाम लोकांना व कर्जदार व जामीनदार यांना कळविणेत येते की, बँकेच्या रामानंदनगरशाखेकडील कर्जदार / जामीनदार यांचेकडून येणे असलेल्या कर्ज खात्यांच्या वसुलीपोटी बँकेने ताब्यात घेतलेल्या स्थावर व जंगम मिळकतींच्या विक्रीसाठी निविदा मागविणेत येत असून इच्छुकांनी सीलबंद पाकीटातून निविदा अर्ज बयाणा रक्कम भरलेल्या पावतीसह व **KYC** पूर्ततेसह संबंधीत शाखाधिकारी ( शाखाधिकारी, सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली फो.नं. ०२३४६- २२२०६१, मोबाईल नं.७८८८००९८१४) / अधिकृत अधिकारी यांचेकडे पाठवावीत व सदर सीलबंद पाकीटावर " **दिनांक ...................... रोजी दुपारी ......... वा. उघडणेसाठीचा ............................ या मिळकतीचा निविदा अर्ज**" असा उल्लेख करावा. सदर निविदा नमूद तारखेस व वेळेत सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली, प्रधान कार्यालय, खणभाग, सांगली येथे उघडणेत येतील.

| कर्जदाराचे व जामीनदाराचे नांव<br>दि. ३०-०६-२०२५ अखेरची येणेबाकी | लिलावाचा वार, तारीख व वेळ, लिलावाचे ठिकाण | स्थावर मिळकतीचे वर्णन | रिझर्व्ह प्राईस व बयाणा रक्कम |
|---|---|---|---|
| १) **श्री. शिवाजी रंगराव लाड** (कर्जदार) मु.पो. कुंडल, ता. पलूस, जि. सांगली<br>**जामीनदार :**<br>२) **श्री. राजेंद्रकुमार दत्तात्रय नरुले** (जामीनदार व मिळकतधारक) ३६, ड्युप्लेक्स न्यू विकासनगर, खेड, सातारा.<br>३) **प्रताप बापूसो लाड**, मु.पो. कुंडल, वीरभद्र कॉलनी, ता. पलूस, जि. सांगली<br>**रु.९६,४१,४९२/- + दि. ०१-०७-२०२५ पासूनचे व्याज व इतर खर्च** | **बुधवार**<br>**दि.०६/०८/२०२५**<br>**दुपारी १.३० वा.** | श्री. राजेंद्रकुमार दत्तात्रय नरुले (जामिनदार व मिळकतधारक) यांचे मालकीची जिल्हा तुकडी तालुका व पोटतुकडी सातारापैकी सातारा येथील नगरपरिषद हद्दीतील रविवार पेठेतील सि.स.नं. १५/१३अ/२ अ / १ याचे एकूण क्षेत्र २२४५.४ चौ. मी. पैकी क्षेत्र ७५.८६ चौ. मी. ही संपूर्ण खुली जागा. | **रिझर्व्ह प्राईस रु. ७०.०० लाख**<br>**बयाणा रक्कम रु. ७.०० लाख** |

**अटी व शर्ती :-** 1.) स्थावर मालमत्तेची विक्री ही **'जशी आहे तशी'** या तत्वावर केली जाईल. 2.) लिलाव प्रक्रियेपूर्वी अधिकृत अधिकारी अथवा संबंधित शाखाधिकारी यांचेकडे पोच झालेल्या निविदा अर्जांचा विचार केला जाईल. 3.) निविदा प्रक्रियेत भाग घेणार यांना निविदेपेक्षा जास्त बोली अधिकृत अधिकारी यांचे परवानगीने बोलता येईल. सदरची बोली रु.50,000/- (रु. पन्नास हजार मात्र) चे पटीत असेल. 4.) निविदा अर्जासोबत बोलीदारास नमूद केलेली बयाणा रक्कम ( RTGS/NEFT ने HDFC बँकेकडील सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या खाते क्र.00070380003940 [IFSC Code - HDFC0000007] भरावी लागेल, सदरची रक्कम बिनव्याजी परतीची (रिफंडेबल) असेल. 5.) जास्तीत जास्त बोली मंजूर होणा-याने बोलीच्या 25% रक्कम निविदा उघडणेच्या दिवशी ( RTGS/NEFTने HDFC बँकेकडील सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या खाते क्र.00070380003940[IFSC Code - HDFC0000007] खाती) बँकेकडे जमा करावी लागेल. 6.) उर्वरित 75% रक्कम व खरेदीपत्रासाठी होणारी स्टॅम्प ड्युटी, नोंदणी फी व इतर खर्च अशी सर्व रक्कम निविदा उघडणेच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आंत बँकेकडे जमा करावी लागेल अन्यथा भरलेली सर्व रक्कम जप्त करण्यात येईल व घेतलेल्या स्थावर मालमत्तेवर बोलीदाराचा अधिकार राहणार नाही. निविदा अर्जदारांनी बँकेकडे भरलेल्या रकमेवर व्याज देणेचे बंधन बँकेवर अगर अधिकृत अधिकारी यांचेवर नाही. 7.) विक्रीचे संदर्भात निविदा उघडलेनंतर निर्माण होणारी कोणत्याही प्रकारची आर्थिक व कायदेशीर जबाबदारी खरेदीदारावर राहील. 8. ) समान रक्कमांच्या निविदांबाबत अधिकृत अधिका-यांचा निर्णय अंतीम राहील. 9.) एका व्यक्तिस एकापेक्षा अधिक निविदा भरणेचा अधिकार राहील. प्रत्येक निविदेसाठी विहीत केलेली बयाणा रक्कम स्वतंत्ररित्या बँकेकडे विहीत वेळेत भरावी लागेल. 10.) इच्छुकास स्थावर मिळकत बँकेच्या पूर्व परवानगीने बँकेच्या कार्यालयीन वेळेत लिलावाचे आदले दिवशी अखेर पहावयास मिळेल. 11.) सदरची जाहीर (निविदा) नोटीस बँकेच्या **www.sangliurbanbank.in** या वेबसाईटवर पहावयास मिळेल. 12.) निविदा विक्री कायम करणेचा अधिकार अधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे. 13.) इतर आर्थिक संस्था / व्यक्ती यांच्या कर्ज बोजा / जप्ती आदेशाच्या नोंदींची यादी -- Nil 14.) निविदा उघडण्यापूर्वी महत्तम निविदाधारकाने विहीत केलेल्या मुदतीत निविदेची पूर्ण रक्कम भरणेपूर्वी कर्ज खाते बेबाक झाल्यास अगर बँकेच्या अपेक्षेप्रमाणे रक्कम मिळकतधारकाने भरल्यास सदर निविदा प्रक्रिया रद्द समजणेत येईल व महत्तम निविदाधारकाने भरलेली रक्कम त्यास परत देणेत येईल. मात्र सदर रक्कमेवर व्याज देणेची जबाबदारी अधिकृत अधिकारी अगर बँकेची राहणार नाही. 15.) विक्री प्रक्रियेतील महत्तम बोलीची रक्कम ही अधिकृत अधिकारी यांचे अपेक्षेप्रमाणे / समाधानकारक नसल्यास विक्री प्रक्रिया रद्द / तहकुब करणेचा अधिकार अधिकृत अधिकारी यांना राहील. 16.) अटी व शर्ती मध्ये बदल करणेचा व त्या शिथील करणेचा अधिकार अधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

**स्थळ : सातारा.**
**दिनांक : १५/०७/२०२५**

शिक्का

(सदर मजकुरात संदिग्धता असल्यास इंग्रजी नोटीस ग्राह्य धरावी)

**सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली करिता,**
सही/- **(पी. डी. पाटील)** अधिकृत अधिकारी (कायदा)

Sun Advertising